संवर्ग :

# पदोन्नती १०० बिंदू नामावली वही

Surbhi HNL.

57

१) मंजुर पदे :

२) भरलेली पदे :

३) रिक्त पदे :

| जात प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | जात प्रमाणपत्र देणारे अधिकारी पदनाम | जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | जात वैधता प्रमाणपत्र देणाऱ्या समितीचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

पोलीस अधीक्षक कार्यालय हिंगोली

विभागीय आयुक्त (मा.व.) औरंगाबाद विभाग औरंगाबाद

विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद
मागासवर्ग कक्ष

पोलीस अधिक्षक, हिंगोली यांनी सादर केलेल्या त्यांचे कार्यालयाच्या आस्थापनेवरील कार्यालयीन शिपाई १००%, कक्षसेवक १००% सरळसेवा पदांची बिंदुनामावली नोंदवहीची तपासणी करण्यात आली असून तपासणी अहवाल या कार्यालयाचे पत्र क्र.२०२३/ मावक/कक्ष-०२/सिआर-४९ दिनांक ०८.०२.२०२३ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे.

ठिकाण :- औरंगाबाद

दिनांक :- ०८.०२.२०२३

9/2/2023

(अरुण पावडे)
प्र.सहाय्यक आयुक्त (मावक)
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**मावक शाखा,**

**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद विभाग (मा.व.क.शाखा),**

**फाजलपुरा, दिल्ली गेट जवळ, औरंगाबाद ४३१००१.**

ईमेल : bcccllabad@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

जा.क्र. २०२३/मावक/कक्ष-२/सिआर-४९

प्रति,

दिनांक :- ०८.०२.२०२३

**पोलीस अधिक्षक,**
**हिंगोली.**

**विषय :-** **<u>बिंदु नामावली नोंदवहीची तपासणी करुन मिळणेबाबत.</u>**
**कार्यालयीन शिपाई १००%, कक्षसेवक १००% सरळसेवा या संवर्गाची बिंदुनामावली नोंदवही**

संदर्भ :- १) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१९/प्र.क्र.११८/ए/२०१९/१६-ब दि.१६ फेब्रुवारी,२०१९
२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी-२०२१/प्र.क्र.३८७/१६-ब दि.०६ जुलै, २०२१.
३) सहाय्यक आयुक्त (मा.व.क.)औरंगाबाद विभाग यांचे पत्र क्र.२०२१/मावक/आस्था/बिं.ना./ दि.१०.११.२०२१.
४) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी-२०२१/प्र.क्र.८३५/१६-ब, दिनांक २५ फेब्रुवारी,२०२२.
५) पोलीस अधिक्षक, हिंगोली यांचे पत्र क्र.जा.क्र.पव्यशा-२/सेवक/कक्षसेवक/वर्ग-४/सरळसेवा/बिंदुनामावली - पडताळणी/२०२३ दिनांक २५.०१.२०२३.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये आपले कार्यालयाचे आस्थापनेवरील कार्यालयीन शिपाई १००%, कक्षसेवक १००%
सरळसेवा बिंदुनामावली नोंदवही व प्रस्ताव अंतीम तपासणीसाठी सादर केला आहे.

सदर पत्रकान्वये पोलीस अधिक्षक, हिंगोली यांनी त्यांचे आस्थापनेवरील कार्यालयीन शिपाई १००%, कक्षसेवक १००%
सरळसेवा सरळसेवेने भरावयाच्या पदांची बिंदुनामावली नोंदवही प्रमाणीत होऊन मिळणेबाबत विनंती केली आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी -२०२१/प्र.क्र. ८३५ ३८७/१६ ब ए, दिनांक ०६.०७.२०२१ अन्वये
मा. सर्वोच्च न्यायालयाने स्पेशल लिव पिटीशन क्रं.३१२३/२०२० मध्ये दिनांक ०५.०५.२०२१ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन
राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय / निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीसाठी दिनांक ०४.०७.२०१९ च्या शासन निर्णयान्वये
विहीत करण्यात आलेली बिंदुनामावली सुधारीत करुन मा.सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षणास स्थगिती दिल्याच्या
दिनांकापासुन म्हणजेच दिनांक ०९.०७.२०२० पासुन शासकीय / निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली
विहीत करण्यात आली आहे.

प्रकरणी छोटया संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्यासाठी कार्यपध्दती सामान्य प्रशासन विभाग, बीसीसी
-२०२१/ प्र.क्र .८३५/१६ ब, दिनांक २५. फेब्रुवारी २०२२ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन यांचेकडील शुध्दीपत्रक क्रमांक २०१९/प्र.क्र. ११८/२०१९/१६-ब, दिनांक १८.०२.२०१९ अन्वये खुल्या प्रवर्गातील
ईडब्ल्युएस वर्गाकरिता आरक्षणाच्या सरळसेवा भरतीसाठी ईडब्ल्युएस ची पदे निश्चित करण्याचे सुचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार पोलीस अधिक्षक, हिंगोली या कार्यालयाची गट ड कर्मचारी १००% सरळसेवा संवर्गाची सामान्य प्रशासन
विभागाचा शासन निर्णय दिनांक २९.०३.१९९७, दिनांक १६.०२.२०१९, दिनांक १८.०२.२०१९ शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-
२०२१/प्र.क्र. ३८/१६ब (ए), दिनांक ०६ जुलै २०२१ व शासन निर्णय दिनांक २५ फेब्रुवारी २०२२, नुसार बिंदु नामावली नोंदवहीची
खालील प्रमाणे तपासणी करण्यात येत आहे. कायमस्वरुपी पोलीस अधिक्षक, हिंगोली यांचे आस्थापने वरील कार्यालयीन शिपाई
१००%, कक्षसेवक १००% सरळसेवा मंजुर, कार्यरत व रिक्त असलेल्या एकुण पदांचा प्रवर्गनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

८/२/२०२३

| जात प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | जात प्रमाणपत्र देणारे अधिकारी पदनाम | जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | जात वैधता प्रमाणपत्र देणाऱ्या समितीचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| ८ | ९ | १० | ११ | १२ |

**१) पदाचे नांव :- कार्यालयीन शिपाई (सरळसेवा १००% )**

**एकुण मंजूर पदे - ०६** **कार्यरत पदे - ०६** **रिक्त पदे ००**

| अ.क्र. | तपशिल | अ.जा १३% | अ.ज. ७% | विजाअ ०३% | भजब २.५% | भजक ३.५% | भजड २% | इमाव १९% | आदुघ १०% | विमाप्र २% | अराखीव ३८% | एकूण १००% | अतिरिक्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजुर पदे | ०१ पद अजा/अज आळीपाळीने | | ०१ पद विजाअ, भजब, भजक व भजड या क्रमाने आळीपाळीने | | | | ०१ पद इमाव कायम स्वरुपी | ०१ पद आदुघ व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने | | ०२ | ०६ | |
| २ | भरलेली पदे | -- | | ०१ पद विजाअ व ०१ पद भजब | | | | -- | -- | | ०४ | ०६ | +०३ |
| ३ | रिक्त पदे | ०१ अजा | | -- | | | | ०१ | ०१ पद आदुघ | | -- | -- | +०३ |
| ४ | दिनांक ३१.१२.२०२२ अखेर पावेतो संभाव्य रिक्त पदे | | | | | | | | | | -- | -- | |
| ५ | एकुण रिक्त पदे | ०१ अजा | | -- | | | | ०१ | ०१ पद आदुघ | | -- | -- | +०३ |

**०६ पदांचे आरक्षण :-** ०१ पद अजा/अज आळीपाळीने, ०१ पद विजाअ, भजब, भजक, भजड या क्रमाने आळीपाळीने, ०१ पद इमाव कायमस्वरुपी, ०१ पद आदुघ व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने असे आरक्षणाची ०४ पदे व अराखीव ०२ पदे असे एकूण ०६ पदे मंजूर आहेत.

**कार्यालयाने दिलेल्या माहितीवरुन सद्यस्थितीत भरलेली पदे :-** ०१ विजाअ, ०१ पद भजब, व ०४ अराखीव असे ०६ पदे भरलेले आहे. **सद्यस्थितीत एकही पद रिक्त नाही.**

**टिप :-** १. अजा-०१ पद, इमाव-०१ पद, आदुघ-०१ पद एकूण ०३ पदांचा अनुशेष शिल्लक आहे. तथापि सद्यस्थितीत एकही पद रिक्त नसल्याने अराखीव संवर्गातून पदे रिक्त झाल्यानंतर प्राधान्याने अनुशेष भरण्यात यावा.

२. अराखीवचे ०२ पदे अनुज्ञेय असताना ०५ पदे भरलेले असून ०३ पदे अतिरिक्त भरल्याचे निदर्शनास येते. याबाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्याची जबाबदारी नियुक्ती प्राधिकारी यांची राहील.

३. आरक्षण डावलून भरती केलेल्या कर्मचारी यांच्यावर शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१ /०९/१६-ब, दिनांक ०५ नोव्हेंबर,२००९ मधील तरतुदीनुसार नियुक्ती रद्द करण्याची व अनुशेष प्राधान्याने भरण्याची नियमाप्रमाणे कारवाई करावी.

४. बिंदु क्र.१३ वरील श्रीमती संजीवनी दुधाराम राठोड या कर्मचारी यांची नियुक्ती विजाअ प्रवर्गातून असून त्यांची नियुक्ती आदेशा दिनांक ०५.०८.२००४ अन्वये जात पडताळणी समितीचे निर्णयाचे आधीन राहुन करण्यात येते असे नमूद असल्याने संबधीत कर्मचारी यांना विजाअ प्रवर्गात दर्शविणे आवश्यक होते. तथापि त्यांना अराखीव बिंदुवर दर्शविण्यात आलेले आहे. याबाबत नियुक्ती प्राधिकारी यांनी खात्री करावी.

५. बिंदु क्र.१४ वरील श्री.दुर्गेश मोहनराव जाधव या कर्मचारी यांची नियुक्ती आदेशात प्रवर्ग नमूद नाही. विभागाने सदर कर्मचारी यांची निवड कोणत्या प्रवर्गातून झाली याची खात्री करुन त्यावर दर्शविणे आवश्यक आहे. याबाबत नियुक्ती प्राधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही करण्याचीजबाबदारी नियुक्ती प्राधिकारी यांची राहील.

६.उपरोक्त त्रुटी / दुरुस्ती च्या अनुषंगाने अधिन राहून वरील आरक्षण विवरणपत्र देण्यात येते.

**२) पदाचे नांव :- कक्ष सेवक (सरळसेवा १००%)**

**एकुण मंजूर पदे - ०२** **कार्यरत पदे - ०२** **रिक्त पदे ००**

| अ.क्र. | तपशिल | अ.जा १३% | अ.ज. ७% | विजाअ ०३% | भजब २.५% | इमाव १९% | भजक ३.५% | आदुघ १०% | भजड २% | विमाप्र ०२% | अराखीव ३८% | एकूण १००% | अतिरिक्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजुर पदे | ०१ पद अजा, त्यानंतर बिंदुनामावलीच्या क्रमानुसार अज, विजाअ, भजब, इमाव, भजक, आदुघ, भजड व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने | | | | | | | | | ०१ | ०२ | |
| २ | भरलेली पदे | ०१ अज | | | | | | | | | ०१ | ०२ | |
| ३ | रिक्त पदे | -- | | | | | | | | | -- | -- | |
| ४ | दिनांक ३१.१२.२०२२ अखेर पावेतो संभाव्य रिक्त पदे | -- | | | | | | | | | -- | -- | |
| ५ | एकुण रिक्त पदे | -- | | | | | | | | | -- | -- | |



/२०२३

**०२ पदांचे आरक्षण :-** ०१ पद अजा, त्यानंतर बिंदुनामावलीच्या क्रमानुसार अज, विजाअ, भजब, इमाव, भजक, आदुघ, भजड व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने असे आरक्षणाची ०१ पद व अराखीव ०१ पद असे एकूण ०२ पदे मंजूर आहेत.

**कार्यालयाने दिलेल्या माहितीवरुन सद्यस्थितीत भरलेली पदे :-** ०१ पद अजा, ०१ पद अराखीवचे भरलेले आहे.
**सद्यस्थितीत एकही पद रिक्त नाही.**

टिप :- बिंदू क्र.०६ वरील श्रीमती सुरेखा गणेश ठाकरे या कर्मचारी यांची नियुक्ती आदेशात प्रवर्ग नमूद नाही. विभागाने सदर कर्मचारी यांची निवड कोणत्या प्रवर्गातून झाली याची खात्री करुन त्यावर दर्शविणे आवश्यक आहे. याबाबत नियुक्ती प्राधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही करण्याचीजबाबदारी नियुक्ती प्राधिकारी यांची राहील.

**खालील नमूद अटींचे अधिन राहून** पोलीस अधिक्षक, हिंगोली **या कार्यालयाची** कार्यालयीन शिपाई १००%, कक्षसेवक १००% सरळसेवा **बिंदुनामावली नोंदवही तपासणी करुन देण्यात येत आहे.**

**अटी**

१. सरळसेवा भरती करतांना समांतर आरक्षण विचारात घ्यावे.
२. मागासवर्गीय अनुशेष प्राधान्याने भरावा.
३. सर्व मागासवर्गीय कर्मचा-यांचे जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन दप्तरी ठेवावे.
४. सदर बिंदूनामावली नोंदवही पोलीस अधिक्षक, हिंगोली यांचे पत्र क्र.जा.क्र.पव्यशा-२/सेवक/कक्षसेवक/वर्ग-४/सरळसेवा/ बिंदुनामावली-पडताळणी/२०२३/४८९ दिनांक २५.०१.२०२३ रोजीचे पत्रास अधिन राहुन प्रमाणित करण्यात येत आहे. बिंदुनामावली नोंदवहीबाबत काही न्यायालयीन तक्रार उद्भवल्यास संबंधित नियुक्ती प्राधिकारी जबाबदार राहतील.
५. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निराधिसुचित जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्गीय यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम २००१, सन २०१८ चा महाराष्ट्राचा अधिनियम क्रमांक ६२ दिनांक ३०.११.२०१८ महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शेक्षणिक संस्थामधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील आणि लोकसेवा मधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे आरक्षण अधिनियम, २०१८ आणि सरळसेवा भरतीच्या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके, अधिसूचनाआदेश, सुधारणा यातील तरतुदीचे तसेच जात पडताळणी विषयक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.
६. शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब दि. १८.०५.२०१३ अन्वये सेवेत असलेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांपैकी, ज्यांनी अद्याप जात वैधता तपासणीसाठी जातपडताळणी समितीकडे अर्ज सादर केला नाही, अशा कर्मचाऱ्यांबाबतीत प्रस्तुत शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी.
७. अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रांच्या आधारे दिनांक १५ जून, १९९५ पुर्वी नोकरीस लागलेल्या कर्मचाऱ्यांपैकी, जे कर्मचारी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरविल्यानंतर ते ज्या मागासवर्गीय प्रवर्गाचे आहेत. त्या मागासवर्गीय प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करु शकत नाही. अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब दि. १८.०५.२०१३ मधील अनुक्रमांक ०५ व ०६ नुसार कार्यवाही करावी.
८. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक २१.१२.२०१९ अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ०६.०७.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयानुसार अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या पदावरील कर्मचा-यांना परिच्छेद क्रमांक १ मधील अ ते इ नुसार अधिसंख्य पदावर वर्ग करण्याची कार्यवाही करणे व सदर पदे रिक्त करणे व भरणेबाबत सुचना दिल्या आहेत. त्याअनुषंगाने शासन निर्णय दिनांक २१.१२.२०१९ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.
९. मागासवर्गीय कर्मचा-यांचे जातवैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास अशा कर्मचा-यांच्या बाबतीत शासन निर्णय दिनांक १८.०५.२०१३, दिनांक २१.१२.२०१९ नुसार कार्यवाही करण्यात यावी.
१०. नियुक्ती प्राधिकारी यांनी सादर केलेले कागदपत्र व पुरविलेल्या माहितीच्या आधारे बिंदु नामावली नोदवहीची तपासणी करण्यात आलेली आहे. सदर माहिती चुकीची असल्यचे निष्पन्न झाल्यास संबंधित नियुक्ती प्राधिकारी जबाबदार राहतील.
११. शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक २९ मे, २०१९ व दिनांक ०५ जुलै, २०२१ नुसार दिव्यांग अधिनियम, २०१६ अन्वये शासन सेवेतील पदांवर शारिरिकदृष्टया दिव्यांग व्यक्तींसाठी ४ टक्के आरक्षण विहित केले आहे.

# पदोन्नती १०० बिंदू नामावली वही

१) मंजुर पदे :
२) भरलेली पदे :
३) रिक्त पदे :

| जात प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | जात प्रमाणपत्र देणारे अधिकारी पदनाम | जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | जात वैधता प्रमाणपत्र देणाऱ्या समितीचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | |

आरक्षणाची अंमलबजावणीसाठी नियुक्ती प्राधिकारी यांनी दिव्यांगाची बिंदु नामावली नोंदवही संस्थेच्या स्तरावर ठेवणे आवश्यक आहे.

१२. सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक दिनांक १० ऑगस्ट २००४ ,व दिनांक १६ ऑगस्ट, २०१० नुसार ५०० पेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या कार्यालयात मागासवर्ग कक्ष स्थापन करण्याची व उक्त परिपत्रकानुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी नियुक्ती प्राधिकारी यांची राहील.

१३. मागासवर्गीयांच्या भरती बाबतचे मंत्रालय/ प्रशासकीय विभाग/संचालक, समाज कल्याण पुणे यांना वार्षिक विवरणपत्र सादर करण्याची जाबदारी नियुक्ती प्राधिकार यांची राहील.

➤ उपसचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्र.२०० A/१६-ब दिनांक १९.०४.२०१८ नुसार खालील परिस्थितीत बिंदु नामावली नोंदवहीची तपासणी करणे आवश्यक राहील.

१. मागासवर्ग कक्षाकडुन रोस्टर पडताळणी झाल्यानंतर तीन वर्षानंतर किंवा दरम्यानच्या कालावधीत मंजुर पदसंख्येत वाढ / घट झाल्यास पदभरतीच्या वेळी अथवा सेवाप्रवेश नियमात बदल झाल्यास विहीत मुदतीपुर्वी बिंदु नामावली नोंदवहीची तपासणी करुन घ्यावी.

२. प्रत्येक वर्षी जर कार्यरत पदसंख्येमध्ये बदल होत असेल म्हणजेच रिक्त पदसंख्या बदलत असेल अशा वेळी दरवर्षी रोस्टर तपासुन आरक्षण निश्चीती करणे आवश्यक राहील.

३. पदभरतीच्या वेळी देखील बिंदुनामावली नोंदवही तपासणी करणे आवश्यक राहील.

४. आरक्षणाची योग्य रितीने अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने ज्यावेळी कार्यरत पदसंख्या बदलत असेल अशावेळी म्हणजेच दरवर्षी रोस्टर तपासणे आवश्यक राहील.

५. ज्यावेळी मंजुर पदसंख्या, कार्यरत पदसंख्या व रिक्त पदसंख्या यामध्ये कोणताही बदल होत नसेल अशावेळी दरवर्षी रोस्टर न तपासता दर तीन वर्षांनी रोस्टर तपासणे उचित होईल.

६. वरील परिस्थीतीत वेळचे वेळी बिंदु नामावली नोंदवहीची तपासणी करुन घेण्याची जबाबदारी नियुक्ती प्राधिकारी यांची राहील.

महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निराधिसुचित जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्गीय यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम २००१, (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ अन्वये उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे पदे आरक्षित ठेवणे व आरक्षणनिहाय पदे भरणे ही नियुक्ती प्राधिका-यांची जबाबदारी आहे. सदर तरतुदींचे पालन न केल्यास संबंधितांविरुध्द आरक्षण अधिनियमाच्या कलम ८ अन्वये कार्यवाही करण्याची जबाबदारी आपल्याया कार्यालयाची राहील, याची नोंद घेण्यात यावी.

६/२/२०२२

(अरुण मावडे)
प्र. सहाय्यक आयुक्त (मावक)
विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद

प्रत:- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी

१. मा. सचिव, सामान्य प्रशासन विभाग,१६ब, मंत्रालय, मुंबई-३२.